| |
|---|
| नि.फौ.ख.क्र.३२७४/२०२२ |
| सरकार वि. मो. जाकीर वगैरे |
| निशाणी क्र.५९ |

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.८ यांची शपथेवर सरतपासणी सुरू</u>**

| मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, | | |
|---|---|---|
| नाव | – | प्रमोद दयाळू दिघोरे |
| वय | – | ४२ वर्षे |
| धंदा | – | पोलीस हवालदार |
| कार्यरत | – | पोलीस स्टेशन सदर |

**<u>सरतपास सरकार पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती संगीता गोगे यांच्याकडून</u>**

सन २०२२ मध्ये मी पोलीस स्टेशन सदर येथे पोलीस नाईक म्हणून कार्यरत होतो. अपराध क्रमांक १६१/२०२२ मधील फिर्याद, घटनास्थळ पंचनामा व वैद्यकीय उपचाराबाबतची कागदपत्रे माझ्याकडे पुढील तपासासाठी प्राप्त झाली. मी साक्षीदारांची बयाने नोंदवली. फिर्यादीने घटनास्थळावरील फुटेजचा लाल रंगाचा पेनड्राईव्ह मला आणुन दिला तो मी नि.क्र.४६ कडील जप्ती पंचनाम्याने जप्त केला. आता मला तो पंचनामा दाखवला. त्यावर माझी, फिर्यादी व दोन पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. फिर्यादीकडुन पुरावा कायदयातील कलम ६५–बी प्रमाणे प्रमाणपत्र प्राप्त केले. जप्त पेनड्राईव्ह सायबर पोलीस स्टेशनकडे हॅश व्हॅल्यु काढण्यासाठी पाठवला. त्याबाबतचे पत्र आता मला दाखवले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र. ६०</u>** देण्यात येते. पोलीस निरिक्षक, सायबर पोलीस स्टेशन कडुन हॅश व्हॅल्युबाबतचा अहवाल व पुरावा कायदयातील कलम ६५–बी प्रमाणे प्रमाणपत्र प्राप्त केले. त्याप्रमाणे हॅश व्हॅल्युबाबतचा नि.क्र. ५२ कडील पंचनामा तयार केला. आता मला तो पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. रासायनीक परिक्षणासाठी जप्त पेनड्राईव्ह आणि आरोपी व फिर्यादी यांचे फोटो पाठवले. त्याबाबतचे पत्र आता मला दाखवले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र. ६१</u>** देण्यात येते. तपासामध्ये आरोपींनी मारहाण केल्याबाबत निष्पन्न झाल्याने कलम वाढ बाबतचे पत्र दिले. आता मला त्याबाबतचे पत्र दाखवले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र. ६२</u>** देण्यात येते. तपासाअंती

आरोपींनी गुन्हे केल्याचे निष्पन्न झाल्याने दोषारोपपत्र पाठवले. आरोपी क्र.३ सोडुन इतर आरोपी आज न्यायालयात हजर आहेत. (आरोपी क्र.३ चा गैरहजेरीमाफीचा अर्ज मंजुर करण्यात आला आहे.)

**<u>साक्षीदाराचा उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री शेख सबाहत</u> –**

२. तपासामध्ये फिर्यादी व आरोपी क्र.३ यांच्यात पतीपत्नीचे भांडण असल्याचे समजले, हे म्हणणे खरे आहे. मी साक्षीदार क्रमांक २ रजनीचे बयान नोंदवले होते. तीने घटनेवेळी आरोपी क्र.३ चे नातेवाईक हजर होते असे सांगितले नव्हते. त्या नातेवाईकांनी फिर्यादीला मारले असे तीने सांगितले नव्हते. तीचे बयान मी दिनांक २६.०४.२०२२ ला घेतले असे घडले नाही. तीचे बयान मी तीच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले नाही, हे म्हणणे खरे नाही.

३. मी साक्षीदार क्रमांक ३ आशिष मानवटकर याचे बयान नोंदवले होते. त्याने फिर्यादी व आरोपी क्रमांक ३ मध्ये वाद झाला असे बयानात सांगितले नव्हते. आरोपी क्र.३ च्या नातेवाईक फिर्यादीस शिवीगाळ करीत होते असे सांगितले नव्हते, हे म्हणणे खरे नाही. बयानामध्ये 'नातेवाईक' हा शब्द नमुद नाही, हे म्हणणे खरे आहे. तसेच बयानामध्ये 'चिडलेले' असा शब्द नमुद नाही, हे म्हणणे खरे आहे. त्याचे बयान दिनांक २७.०४.२०२२ अगर २८.०४.२०२२ ला घेतले असे घडले नाही. त्याचे बयान मी त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले नाही, हे म्हणणे खरे नाही.

४. मी वालदे यांच्या घरातुन सीसीटीव्ही फुटेज जप्त केले नाही. मी साक्षीदार क्रमांक ४ शब्बीर याचे बयान नोंदवले होते. त्याने त्याच्या गाडीची काच आरोपींनी फोडली म्हणुन दिनांक २६.०४.२०२२ रोजी तक्रार दिली नव्हती. त्याने माझ्याकडे तपासामध्ये गाडीच्या विम्याबाबतची कागदपत्रे दिली नाहीत. त्याने गाडीच्या मालकीसंबंधीची कागदपत्रे दिली नाहीत. त्याचे बयान मी त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले नाही, हे म्हणणे खरे नाही.

५. मी साक्षीदार क्रमांक ५ रत्नमाला पिल्लेवार यांचे बयान नोंदवले होते. त्यांनी घटनेवेळी ती अंगणात बसली होती व आरोपी क्र.३ ला फॅन घेवुन जायचा होता त्यास फिर्यादीचा नकार होता असे सांगितले नव्हते. त्यांनी फिर्यादीचे तोंड फुटले असे सांगितले नव्हते. साक्षीदारांनी आरोपींचे नाव सांगितले नव्हते, हे म्हणणे खरे नाही. त्यांचे बयान मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले नाही, हे म्हणणे खरे नाही. घटनेदिवशी सदर साक्षीदाराकडे विचारणा केल्याबाबत मला माहीती नाही. पंच साक्षीदारांना मी लेखी सुचनापत्र दिले नव्हते. घटनेदिवशी दुपारी ०३.३० वाजता फिर्यादीने पोलीस

स्टेशनला घटनेबाबत फोनवरुन कळवले होते याची मला तपासात माहीती मिळाली. फोनवरुन गुन्हा घडल्याबाबत कळवण्यात आल्यानंतर स्टेशन डायरीला नोंद करण्यात येते, हे म्हणणे खरे आहे. फिर्यादीने घटनेबाबत फोनवरुन कळवल्याबाबत संबंधीत डयुटी अधिका–याने स्टेशन डायरीवर नोंद केली असेल. त्यावेळी डयुटी अधिकारी श्रीमती भारती गुरनुले होत्या.

६.        नि.क्र. ४६ कडील जप्ती पंचनामा खोटा आहे, हे म्हणणे खरे नाही. त्या पंचनाम्यावर कॉलम क्रमांक १३ मध्ये व्हाईटनर लावलेला आहे व त्या ठिकाणी प्रती सही नाही, हे म्हणणे खरे आहे. पंचनाम्यामध्ये छेडछाड केली आहे, हे म्हणणे खरे नाही. नि.क्र.६० व ६१ कडील पत्र खोटे आहेत, हे म्हणणे खरे नाही. नि.क्र.५२ कडील हॅशव्हॅल्युबाबतचा पंचनामा खोटा आहे, हे म्हणणे खरे नाही. पुरावा कायदयातील कलम ६५–बी प्रमाणे प्रमाणपत्रे खोटे आहेत, हे म्हणणे खरे नाही. नि.क्र.६२ कडील कलमवाढीबाबतचे पत्र खोटे आहे, हे म्हणणे खरे नाही. नि.क्र. ४४ कडील घटनास्थळ पंचनाम्यामध्ये घटनास्थळावर गाडीच्या काचेचे तुकडे आढळले असे नमुद नाही. खोटा तपास करुन आरोपींविरुध्द खोटे दोषारोपपत्र पाठवले, हे म्हणणे खरे नाही. मी खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खरे नाही.

**<u>फेरतपास काही नाही</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत                                        माझे समक्ष,

नागपूर                                                    (यु.पी. कुलकर्णी)
दिनांकः–  १४.१०.२०२४                                     मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर